दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक), नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

मुंबई || वर्ष २ रे || अंक २३७ || सोमवार १२ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




# नैसर्गिक आपत्तीबाधितांना यंदा निकषाच्या दुपटीने मदत

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्यातील सर्व समाजघटकांना खूश करताना यंदा अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधितांना राज्य आपत्ती प्रतिसाद मदतीच्या दुपटीने मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याचा लाभ लाखो कटुंबांना होणार आहे.



केंद्राच्या नैसर्गिक आपत्ती निकषांच्या धर्तीवर राज्यातही नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यास बाधितांना या निधीच्या माध्यमातून मदत केली जाते.

या मदतीमधील ७५ टक्के वाटा केंद्राचा, तर २५ टक्के भार राज्य सरकारवर असतो. केंद्र सरकारने गेल्या वर्षी नैसर्गिक आपत्तीमधील बाधितांना देण्यात येणाऱ्या मदतीत– नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीच्या मदतीत (२०२२–२३ ते २०२५–२६) या कालावधीसाठी भरीव वाढ केली आहे. त्यानुसार भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, हिमवर्षाव, ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट, यामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद मदतनिधीतून बाधितांना मदत मिळते, तर राज्यात केंद्राच्या निकषाशिवाय वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यासाठीही राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून आर्थिक मदत केली जाते.

राज्यातील महायुती सरकारने २७ मार्च २०२३ रोजी केंद्राच्या धोरणाप्रमाणेच राज्यातही आपत्तीबाधितांना मदत देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र यंदा राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन २७ मार्च २०२३चा निर्णय शिथिल करीत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सध्याच्या मदतीपेक्षा दुपटीने मदत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागातील सूत्रांनी दिली.

निर्णय काय?

महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयानुसार यंदाच्या मान्सूनमध्ये म्हणजेच जून ते ऑक्टोबर दरम्यान अतिवृष्टी व पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना पुरेशी मदत तातडीने मिळावी यासाठी विशेष दराने मदत देण्यात येणार आहे. दोन दिवसांपेक्षा अधिक काळ क्षेत्र किंवा घर पाण्यात बुडाले असल्यास, घर पूर्णत: वाहून गेले असल्यास प्रतिकुटुंब कपडयांच्या नुकसानीसाठी पाच हजार आणि घरगुती भांडी, वस्तूंच्या नुकसानीसाठी पाच हजार असे १० हजार रुपये लगेच देण्यात येणार आहेत. यावेळी घर दोन दिवस पाण्यात बुडाल्याची अटही शिथिल करण्यात आली असून केवळ घरात पाणी शिरुन नुकसान झाले तरीही मदत मिळणार आहे. तर दुकानदारांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे टपरीधारकांना मदत देण्याची तरतूद राज्य आपत्ती निधीत नसली तरी यंदा मात्र मतदार यादीत नाव असलेल्या टपरीधारकांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० हजार रुपये मदत देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

# भाजपच्या मित्रपक्षाचीही वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकाच्या फेरविचाराचीच भूमिका

पुणे – केंद्र सरकारकडून वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक संसदेत मांडून ते मंजूर होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यास विरोधी पक्ष म्हणून आम्ही कडाडून विरोध केला आहे. भाजपचेच मित्रपक्ष असलेल्या चंद्राबाबू नायडू, नितीशकुमार यांनी विधेयकाबाबत फेरविचार करावा, अशी भूमिका घेतली आहे. असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा व खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी सांगितले.



प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची शनिवारी भेट घेतली. त्यानंतर कडू यांच्यासमवेत सुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मुख्यमंत्री पदावर दावा करणार का? या प्रश्नावर बोलताना सुळे म्हणाल्या, मुख्यमंत्री पदावर आम्ही दावा केलेला नाही.

आमचा पक्ष यशवंतराव चव्हाण यांच्या संस्कारावर चालणारा पक्ष आहे. आम्ही सत्ता, पदे यापेक्षा विकास व चांगली धोरणे करण्यावर भर दिला जातो. आता महाराष्ट्रापुढे वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार व बेरोजगारी हे प्रश्न असून त्याविरुद्ध आम्ही लढा देणार आहोत. अगोदर सत्तेत येऊन चांगले काम करू.

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा महाविकास आघाडीच्या मतांवर परिणामांबाबत विचारलेल्या प्रश्नाला सुळे यांनी उत्तर दिले. सुळे म्हणाल्या, महाविकास आघाडीची मते जातील, त्याचप्रमाणे महायुतीचीही मते कमी होणार आहेत. परंतु आम्ही मतांची आकडेमोड करण्यासाठी आलो नाही. महायुतीच्या पहिल्या कॅबिनेटमध्येच धनगर समाजाला आरक्षण देऊ असे त्यांनी सांगितले होते. आता त्यास दहा वर्षे पूर्ण झाली, परंतु अजूनही आरक्षण मिळालेले नाही. हे सरकार लोकांना फसवण्याचे काम करत आहे.

सुळे म्हणाल्या, बच्चू कडू यांनी दिव्यांगांसाठी चांगले काम केले आहे, दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणले असून हे पुढच्या कित्येक पिढ्या कधीही विसरणार नाहीत. जे चांगले लोक आहेत, त्यांनी एकत्र आले पाहिजे. सध्या देशाची आर्थिक स्थिती चिंताजनक आहे. वित्तीय तूट वाढत असून त्याचा राज्यांवरही परिणाम होणार आहे. आंध्र प्रदेशात याचे परिणाम दिसत असून, महाराष्ट्राचेही असे हाल होऊ नयेत, यासाठीच चांगल्या लोकांनी राज्याच्या, देशाच्या विकासासाठी एकत्र येण्याची गरज आहे.सुळे म्हणाल्या,– घरे फोडा, पक्ष फोडा हेच या सरकारचे काम – इन्कमटॅक्स, सीबीआयच्या नोटीसांवरच हे सरकार तरले

– महाविकास आघाडी २८८ जागा चर्चेच्या मार्गाने सोडविणार

– कार्यकर्त्यांचा मानसन्मान राखूनच तिकिटांचे वाटप होणार

# वाढवणला 'समृद्धी'; राज्यातून समृद्धी महामार्गाने वाढवणला जलद येण्यासाठी इगतपुरीपासून नवा मार्ग

मुंबई : पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे देशातील सर्वात मोठे बंदर उभारण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गावरून वाढवण बंदरावर पोहचता यावे यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या महामार्गाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे.

इगतपुरी चारोटी असा ९० किमीचा महामार्ग एमएसआरडीसी बांधणार आहे. तर चारोटी ते वाढवण बंदर अशा अंदाजे ३५ किमीच्या महामार्गाचे बांधकाम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) करणार आहे. त्यानुसार इगतपुरी ते चारोटी द्रुतगती महामार्गाचा प्रस्ताव लवकरच राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. या अंदाजे १२५ किमी लांबीच्या द्रुतगती महामार्गामुळे नागपूर वाढवण बंदर थेट प्रवास अवघ्या काही तासांमध्ये करता येणार आहे.

राज्यातील दोन मोठ्या जेएनपीटी आणि मुंबई बंदरांची कंटेनर हाताळण्याची क्षमता संपुष्टात येत आहे. त्यामुळे नवीन बंदर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सागरमाला उपक्रमाअंतर्गत




जगातील पाचव्या क्रमांकाचे मोठे बंदर डहाणू तालुक्यातील वाढवण येथे उभारण्यात येणार आहे. या बंदराची उभारणी झाल्यानंतर विदर्भ, मराठवाडा आदी ठिकाणांहून मालवाहतूक वा इतर प्रकारची वाहतूक अतिवेगवान व्हावी, नागपूर वाढवण बंदरदरम्यान थेट प्रवास करता यावा यासाठी एमएसआरडीसी कामाला लागले आहे. त्यातूनच समृद्धी महामार्गाच्या विस्तारीकरणाची संकल्पना पुढे आल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. या विस्तारीकरणानुसार इगतपुरी ते वाढवण बंदर, पालघरदरम्यान द्रुतगती मार्ग बांधण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी याला दुजोरा दिला आहे.

अंदाजे १२५ किमीचा मार्ग इगतपुरी वाढवण बंदर द्रुतगती महामार्ग अंदाजे १२५ किमी लांबीचा असणार आहे. नागपूर मुंबई समृद्धी महामार्गातील इगतपुरी आंतरबदल येथून इगतपुरी ते मुंबई अहमदाबाद महामार्गावरील चारोटी नाका असा ९० किमी लांबीचा महामार्ग एमएसआरडीसी बांधणार आहे. यासाठी अंदाजे नऊ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या ९० किमी लांबीच्या महामार्गाचा प्रस्ताव एमएसआरडीसी तयार करीत आहे. तर इगतपुरी चारोटी महामार्गाचा प्रस्ताव येत्या काही दिवसांतच राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्याने सांगितले. चारोटी येथे समृद्धी महामार्ग येऊन पोहचल्यानंतर वाढवण बंदरापर्यंत द्रुतगती महामार्ग नेण्याची जबाबदारी एनएचआयची आहे, अशी माहिती एमएसआरडीसीकडून देण्यात आली. चारोटी वाढवण बंदर द्रुतगती महामार्ग अंदाजे ३५ किमी लांबीचा असणार आहे. वाढवण बंदर हा केंद्र आणि राज्य सरकारचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्यामुळे वाढवण बंदराला राज्यातील शक्य तितक्या जिल्ह्यांशी जोडण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यातूनच या विस्तारीकरणाचा विचार पुढे आला आहे.

# मुंबई येथील मुकेश अंबानीच्या आलीशान घरा बद्दल व्हॉटसअॅप वर वायरल होत असलेल्या मेसेज

मुंबई – मुकेश अंबानी यांनी २००२ मध्ये अँटिलिया बांधण्यासाठी २१.५ कोटी रुपयांमध्ये ४,५३२.३९ चौरस मीटरचा भूखंड खरेदी केला होता. अंबानींचे हे घर दक्षिण मुंबईतील पेडर रोडवर बांधले आहे आणि जगातील सर्वात महागड्या घरांपैकी एक मानले जाते. हे बहुमजली घर वक्फ बोर्डाच्या जमिनीवर आहे, पूर्वी येथे मुलांसाठी अनाथालय होते, त्यावर मोठे अनाथालय बांधू असे सांगून अंबानींनी जागा घेतली आणि आपला वाडा बांधला.त्यामुळे अंबानींवर खटला दाखल झाला आणि हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात गेले अंबानी यांनी जमीन खरेदी करताना वक्फ बोर्डाच्या कलम ३२(२) चे उल्लंघन केल्याचेही उच्च न्यायालयाने मान्य केले आहे.न्यायालय कधीही अँटिलिया पाडण्याचा निर्णय देऊ शकते, अंबानींच्या अँटिलियाला वाचवण्यासाठी सरकार आज वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक आणत आहे.ङ्ग एवढेच नाही तर महाराष्ट्र





विधानसभेच्या वक्फ बोर्डाने यापूर्वी सादर केलेल्या कृती अहवालात (एटीआर) असे म्हटले आहे की, वक्फ बोर्डाने अंबानींना घर बांधण्यासाठी नाही तर अनाथाश्रम बांधण्यासाठी जमीन विकली होती आणि अँटिलिया यांनी ही जमीन बांधली होती. चुकीच्या पद्धतींचा अवलंब. हा अहवाल स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहवालाच्या आधारे सरकार कारवाई करेल, असे सांगितले होते. कुणालाही सोडले जाणार नाही, असेही ते म्हणाले. ङ्ग रिलायन्सच्या प्रवक्त्याने या प्रकरणी एवढेच सांगितले की, ते आधी अहवाल पाहतील आणि त्यानंतरच काही प्रतिक्रिया देतील.ङ्ग त्यानंतर विधानसभेत सादर करण्यात आलेल्या एटीआरमध्ये म्हटले आहे की, करीम भाई इब्राहिम यांनी ही जमीन १९८६ मध्ये वक्फ बोर्डाला धार्मिक शिक्षण आणि अनाथाश्रम बांधण्यासाठी दिली होती, परंतु बोर्डाने ती अंबानींना विकली.ङ्ग हा करार सुरुवातीपासूनच वादात सापडला होता, कारण विकली गेलेली जमीन वक्फ बोर्डाची होती. हा वाद वाढत गेल्याने निवृत्त न्यायाधीश ए.टी.के. शेख यांच्याकडे तपासाची जबाबदारी देण्यात आली आणि त्यांचा अहवाल सरकारला सादर करण्यास सांगण्यात आले.ङ्ग केस कोर्टात आहे आणि अँटिलियाला धोका आहे.ङ्ग एखाद्या मालकाला वाचवण्यासाठी देशातील कोट्यवधी नागरिकांनी दान केलेल्या पैशाला लक्ष्य करणे निंदनीय आणि लज्जास्पद आहे.

संपादकीय

## तीकडे दुर्लक्ष

आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले नव्हते तोपर्यंत अभियांत्रिकीच्या तीन शाखांवर आपल्याकडे भर दिला जात असे. यांत्रिकी (मेकॅनिकल), विद्युत (इलेक्ट्रिकल) आणि स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी या तीन शाखांची विभागणीही गुणानुक्रमे होत असे. यापेक्षाही गुणवान 'आयआयटी'त जात. त्याही काळात याद्वारे होणारी अभियंत्यांची निर्मिती पुरेशी नव्हतीच आणि होते त्यातील गुणवान परदेशी जाण्यात धन्यता मानत. ही अभियंत्यांची संख्या वाढवावी या वरकरणी आणि दिखाऊ हेतूने आणि स्वपक्षीय राजकारण्यांस धननिर्मितीचे सहज सोपे साधन निर्माण व्हावे या अंतस्थ आणि खऱ्या हेतूने तेव्हा खासगी अभियांत्रिकीची दुकाने आपण मोठ्या प्रमाणावर उघडली. एखादी नवी योजना हाती घेण्याआधी तिच्या अंमलबजावणीचा साकल्याने विचार आणि तशी तयारी न करण्याचा आपला ऐतिहासिक परिपाठ याबाबतही दिसून आला. या नव्या खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे ना आवश्यक साधनसामग्री होती ना प्रशिक्षित अध्यापक. त्यात या संस्थांचे चालक पडले राजकारणी. त्यामुळे कोणत्याही दर्जा निश्चितीखेरीज पिठाच्या चक्क्यांप्रमाणे ही अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली गेली. स्वपक्षीय राजकारण्यांस सुखावण्यासाठी वा अन्यपक्षीय राजकारणी आपल्याकडे यावेत यासाठी या महाविद्यालयांचा खिरापतीप्रमाणे वापर झाला. ही महाविद्यालयांची संख्या इतकी वाढली की ती जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक विद्यार्थीही आपणास मिळेनासे झाले. ही धोक्याची पहिली घंटा.

तीकडे दुर्लक्ष केल्याने परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडत गेली. ती आणखी रसातळाला नेण्यात महत्त्वाचा वाटा उचलला नव्याने उदयास आलेल्या संगणकीय विद्याशाखेने. त्यातही बाजारपेठी आकर्षणास बळी पडून घरोघरी आपल्या लेक/लेकीस ''तू हार्डवेअरपेक्षा 'सॉफ्टवेअर'ला जा'' असे सल्ले मुबलक पालक देत. त्यामुळे अमूर्त अशा या विद्याशाखेत भरती होणारे वाढत गेले. त्यातील बहुसंख्य हे 'संगणकीय टंकलेखक' या दर्जाचे होते हे नाकारणे अवघड. यांचीही संख्या अखेर इतकी वाढली की बरकत असूनही सॉफ्टवेअर उद्याोगावर त्यांना दरवाजाबाहेर बाकांवरच बसवण्याची वेळ आली. मागणीपेक्षा पुरवठा अधिक झाला– आणि तोही कमअस्सल दर्जाचा– की यापेक्षा आणखी काय होणार? संगणक अभियंते वाढले म्हणून भारतीयांनी काही संगणकीय उत्पादनांची निर्मिती केली म्हणावे तर त्याबाबतही बोंब. या क्षेत्रातील जे गुणवान होते त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरला आणि गूगल, ॲपल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट आदी क्रियाशीलांची सेवा करण्यात धन्यता मानली. हे कमी म्हणून की काय या काळात एका नव्याच क्षेत्राचा उदय झाला.

ते म्हणजे सेवा क्षेत्र. कुणीतरी घरे बांधायची आणि इतरांनी ती सांभाळायची, घरात काही हवे–नको ते पाहायचे आणि लागेल तेव्हा हरकामास दाराशी सेवेस सादर व्हायचे म्हणजे 'सर्व्हिस इंडस्ट्री'. कितीही उदात्तीकरणाचा प्रयत्न केला तरी सेवा क्षेत्र म्हणजे अखेरीस यापेक्षा अधिक काही नाही. इंटरनेट महाजालाच्या प्रसार– प्रभावामुळे दूरदेशीच्या आस्थापनांचे पगार काढणे, कर्मचारी व्यवस्थापन, दूरध्वनीवरून माहिती देणे इत्यादी उद्याोग येथे बसून करण्याची सुविधा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याने आणि त्या प्रमाणात त्या क्षेत्रात रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने आपल्याकडे तरुणांच्या झुंडीच्या झुंडी त्या क्षेत्रात दाखल होऊ लागल्या. इतके दिवस अमेरिका, युरोप आदी विकसित देशांतील नोकरीच्या उच्चमध्यमवर्गीयांपुरत्याच उपलब्ध असलेल्या संधी या सेवा क्षेत्राच्या विस्ताराने बहुजन समाजातील तरुणांसही सहज मिळू लागल्या आणि पुणे, पार्ले, डोंबिवली आदी शहरांची मक्तेदारी पिंपरी–चिंचवड, परभणी आणि डिग्रस आदींनी मोडून काढली. यास जोड मिळाली ती वाढत्या वित्तीय (फायनान्स) आणि नंतर वित्त–तंत्र (फिनटेक) या क्षेत्रांची. कमी कष्टात अधिक पैसा कसा मिळवता येतो हे पहिल्याने दाखवून दिले आणि या दुसऱ्याने या वित्तक्षेत्रास सेवेची जोड दिली. अभियंते होऊन स्वत:स कष्टवण्यापेक्षा भांडवली बाजारात पैसे फिरवत अधिक नफा मिळवून देणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या या काळात अतोनात वाढली. परदेशी गुंतवणूकदारांस या काळात दोन पर्याय होते. चीन आणि भारत. यातील पहिला पर्याय निवडणाऱ्यांस चिनी राज्यकर्त्यांनी कारखानदारीत गुंतवणूक करणे भाग पाडले आणि दुसऱ्या पर्यायात भारतात फक्त पैसा आला. गुंतवणूक नाही.

# रायगड टॅलेन्ट सर्च या स्पर्धा परीक्षेस माणगाव तालुक्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी चांदोरे माणगाव : नंदकुमार चांदोरकर

रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक आदरणीय पूनिता गुरव मॅडम यांच्या प्रेरणेतून शिष्यवृत्ती परीक्षा पूर्वतयारी रायगड टॅलेंट सर्च हे जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी सुरू करण्यात आलेले असून रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातून ३००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी यासाठी रजिस्ट्रेशन केलेले आहे.ङ्क शनिवार दि.०३ ऑगस्ट २०२४ रोजी चा पेपर क्रमांक ०१ रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील विविध केंद्रांवर घेण्यात आला. माणगाव तालुक्यातून गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट



मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली तळाशेत , माणगाव आणि गोरेगाव या परीक्षा ३ केंद्रावर १४८ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी सहभाग नोंदविला.निकाल पुढील प्रमाणे ङ्कपरीक्षा केंद्र तळाशेत १)आयुष सुधीर निकम १८६ भूवन,२)श्रवण सुधीर गव्हाणे १६२ कोल्हाण, ३)स्वरूप किरण बडेकर १४६ निवी, ४)सई प्रदीप कासार १४४ तळाशेत, ५)विहान विठोबा बारस्कर १३४ नगरोली, ङ्क परीक्षा केंद्र माणगाव ङ्क१)सार्थक अंकुश जाधव २३६ पाणोसे कोंड, २)प्रथमेश नरेश जाधव २१२ पाणोसे कोंड, ३)स्वरा संतोष खानविलकर १८२ भाले, ४)अवनी संदेश कदम १८० कोस्ते बुद्रुक, ५)रुद्र रवींद्र बेंदुगडे, १७४ सुरव तर्फे तळे ५)जुई सुरेंद्र नागोठकर १७४ उतेखोलवाडी,ङ्क. परीक्षा केंद्र गोरेगावङ्क१)अक्षरा वैभव सूर्यवंशी २६४ भिंताड ,२)आदित्य दादासाहेब निंबाळकर २१६ नागाव, ३)निहान अर्जुन गावडे १९२ वडगाव कोंड,४)स्वरांजली धर्मराज चिकणे १६४ वडवली कोंड, ४)ओम राजेश पानसरे १६४ वडगाव कोंड, ५)काव्या परेश गायकवाड १६० वडवली कोंड या परीक्षेसाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षक मंगेश म्हस्के,कुमार उपरे,अमोल गुरव,अशोक मालवे,सुधा मोरे मॅडम,आनंद गायकवाड,संदीप साळवी,सुदर्शन वाघोरकर,वैभव सूर्यवंशी,प्रकाश खडसे,राज कडू,विशाखा डांगे,लतिका गोरेगावकर,नेहा जाधव केंद्र संचालक, पर्यवेक्षक म्हणून प्रत्येक केंद्रावर उत्तमरीत्या काम करून तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी खूप मोलाचे योगदान दिले.मुकेश भोस्तेकर यांनी तालुका प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली.ङ्क ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी व्हावी व मुलांना शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेत घवघवीत यश मिळविण्यासाठी ही संकल्पना गावागावात पोहोचणे गरजेचे आहे. यासाठी श्री रत्नाकर पाटील सर, सर्व जिल्हा ,तालुका,केंद्र कमिटी यांचे खूप मोलाचे योगदान आहे.

# भीती नको सतर्क रहा माणगाव बुद्रुक बिबट्या बद्दल जनजागृती कार्यक्रम ; ट्रॅप कॅमेरे बसविणार

अमित गवळे

पाली, ता. ११ (वार्ताहर) सुधागड तालुक्यात घोटवडे तसेच माणखोरे विभागात शेळी, जनावरे तसेच भटक्या कुत्र्यावर बिबट्याने हल्ला केल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्या अनुषंगाने ग्रुप ग्रामपंचायत माणगाव बुद्रुक येथे वनविभागाच्यावतीने नुकतेच बिबट्या बद्दल जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी वन विभाग कर्मचारी व रेस्क्यू चॅरीटेबल ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी प्रोजेक्टर च्या सहाय्याने स्लाइड्स दाखवून जनजागृती केली. तसेच ग्रामस्थांच्या शंकांना समर्पक उत्तरे दिली. बिबट्याच्या हालचाली नोंद करण्यासाठी वनविभाग याठिकाणी दोन ट्रॅप कॅमेरे लावणार आहेत.ङ्क भीती नको पण सतर्क रहा, खबरदारी घ्या असे यावेळी सांगण्यात आले. बिबट्याची जीवनपद्धती, त्याचे जैवसाखळीतील महत्व, त्याला न पकडता नैसर्गिक अधिवासात ठेवणे अशा विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ग्रामस्थांना सुरक्षिततेच्या दृष्टीने सतर्क राहण्याचे व काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला वनविभागाचे अश्विनी जाधव, शेषराव पवार, मारोती मुंडे, शिवानी शिंदे, अंकिता फफाळे, अशोक कोहकडे, योगेश साजेकर, सर्पमित्र दत्तात्रेय सावंत, अमित निंबाळकर, तुषार केळकर, राजू देशमुख उपस्थित होते. सरपंच रमेश साळुंके यांनी उपस्थितांचे आभार मानले.




ही घ्या खबदारी वन विभागाने सांगितले आहे की खबरदारीचे उपाय म्हणून रात्री घराबाहेर पडू नका, आवश्यक असल्यास गटा गटांनी हातात काठी बॅटरी घेऊन बाहेर पडा. रात्री कुत्रे जोर जोराने भुंकत असल्यास बिबट्या जवळ असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शेळ्या, मेंढ्या, गाय म्हैस, कोंबड्या बंद गोठ्यात ठेवाव्यात, बिबट्या सहसा जाणीवपूर्वक माणसावर हल्ला करत नाही. बिबट्याला हाकलण्यासाठी त्याला दगड मारू नये व त्याचा पाठलाग करू नये ते आपणास धोकेदायक ठरू शकते, बिबट्या आल्यास भांडी वाजवा, फटाके वाजवा, जोर जोराने आरडा ओरड करा, घराच्या बाजूने रात्रीच्या वेळी लाईट चालू ठेवावी.

अन्नसाखळीतील महत्त्वाचा घटक बिबट्या हा अन्नसाखळीतील महत्त्वाचा घटक आहे. त्याचे अस्तित्व कमी झाले तर अन्नसाखळीतील इतर प्राण्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. बिबट्या हा अनुसूची एक मधील वन्य प्राणी असल्याने या वन्य प्राण्याची शिकार करणे किंवा इजा करणे किंवा शिकारीचा प्रयत्न करणे हा वन्य जीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ९ अन्वये गुन्हा आहे. ङ्कङ्कङ्ककोटङ्कबिबट्या आपल्या विभागात वावरत असल्याने आपल्यावर बिबट्याचा हल्ला होऊ नये म्हणून नियमांचे पालन करून काळजी घ्यावी. तसेच या परिसरात स्पीकरद्वारे रोज अनाउन्समेंट करण्यात येत आहे. काही संशय आल्यास वन विभाग हेल्पलाइन क्र.१९२६ ला संपर्क करावे किंवा वनपाल घोटावडे ९६६७९६१२२९ वनरक्षक ७०३९०८१५२४/७७१००५४०२४ या क्रमांकावर संपर्क करावे.

अश्विनी तरसे, तालुका वन परिक्षेत्र अधिकारी,विकास तरसे, तालुका वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी

# दोस्तांसाठी रक्तदान रुपी शुभेच्छा, एका शिक्षकाचे अनोखे मित्र प्रेम आत्तापर्यंत ५१ वेळा रक्तदान

पाली/बेणसे दि.(धम्मशील सावंत)मित्र –मैत्रिणी फ्रेंडशिप डेला किंवा वाढदिवशी एकमेकांना भेट वस्तू, शुभेच्छा पत्र किंवा संदेश देवून शुभेच्छा देतात. परंतू पालीतील विक्रम काटकर हे



शिक्षक मागील अनेक वर्षांपासून रक्तदान करुन आपल्या मित्रांना फ्रेंडशिप डे किंवा त्याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान रुपी शुभेच्छा देतात. आत्तापर्यंत त्यांनी तब्बल ५१ वेळा रक्तदान केले आहे. त्यांचा हा विधायक उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. तसेच मैत्रीचे धागे आणखी भक्कम होत आहेत.ङ्क विक्रम काटकर पालीतील ग.बा. वडेर हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. आपले मित्र व नातेवाईक यांचे वाढदिवस शिवाय फ्रेंडशिप डे चे औचित्य साधून विक्रम काटकर रक्तदान करतात. नुकतेच काही दिवसांपूर्वी त्यांनी रक्तदान केले आहे. आणि मैत्रिदिनाच्या शुभेच्छा आपल्या मित्रांना दिल्या आहेत. याबरोबरच कोणाला तातडीने रक्ताची आवश्यकता असल्यास देखील ते रक्तदान करतात. त्यांनी रक्तदान केल्याने अनेकांना जीवदान मिळाले आहे. शिवाय रक्तदान केल्यावर मिळणाऱ्या कार्डच्या द्वारे संपर्कातील अनेकांना मोफत रक्त सुद्धा मिळाले आहे.ङ्कङ्कचौकट ङ्कजनजागृती ङ्क रक्तदानच्या माध्यमातून मित्रांना शुभेच्छा व भेट द्यावी अशी कल्पना विक्रम काटकर यांना सुचली. त्यामुळे यामाध्यमातून रक्तदानाबाबत जनजागृती तर होत आहेच. पण अनेकजण रक्तदान करण्यास पुढे देखील येत आहेत. विक्रम काटकर यांच्या या विधायक उपक्रमामुळे अनेकजण भारावून गेले आहेत. शिवाय जमेल तसे रक्तदानासाठी पुढे देखील येत आहेत असे त्यांचे मित्र सुजित जगताप यांनी सांगितले.ङ्ककोट १ङ्कआतापर्यंत ५१ वेळा रक्तदान केले आहे. मित्र व जवळचे नातेवाईक यांच्या जन्मदिनी तसेच मैत्रिदिन व काही महत्वाच्या दिवसांचे औचित्य साधून रक्तदानच्या माध्यमातून शुभेच्छा देण्याचा संकल्प केला आहे. यातून रक्तदान चळवळी विषय जाणीव जागृती वाढत आहे. शिवाय मैत्रीचे नाते देखील घट्ट होते. तसेच नवनवीन लोक स्वतःहून रक्तदान करण्यासाठी पुढे येवून अनेकांचा जिव वाचेल असा विश्वास वाटतो.ङ्कविक्रम काटकर, शिक्षक, रक्तदानकर्तेङ्कङ्ककोट २ङ्क अशा प्रकारे कोणी शुभेच्छा देवू शकतो याची कल्पनासुद्धा करु शकत नाही. लोककल्याणकारी ध्येय डोळयासमोर ठेवून विक्रमने हे अभियान राबवित आहे याचा आम्हा सर्व मित्रांना अभिमान वाटतो. त्याचा हा संकल्प अविरत सुरु राहो यासाठी त्याला खुप शुभेच्छा व आभार.ङ्कटिळक खाडे, शिक्षक, काटकर यांचे मित्र

# जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना सिंधुदुर्ग येथे मोफत वह्या वाटप, प्रत्येक माणसाच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचे काम निलेश सांबरे करत आहेत – नितेश राणे

दै.सूर्योदय,सिंधुदुर्ग,(प्रतिनिधी): कोकणात युवा संदेश प्रतिष्ठान आयोजित सिंधुरत्न टॅलेंट सर्च बक्षीस वितरण सोहाळा सिंधुदुर्ग येथे आयोजित करण्यात आला होता . निलेश सांबरे यांचे कौतुक केले. तर ''प्रत्येक माणसाच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचे काम निलेश सांबरे करत आहेत . कुठलेही शासनाचे अनुदान अथवा यांना दिले आहे . लवकरच ते या प्रेमाच्या बळावर मोठा पल्ला गाठतील , तसेच राजकारणात युती होणे आघाडी होणे हे काही नवीन नाही मात्र सामाजिक कामात जिथे कुठे कोकणातला प्रत्येक माणूस सर्वार्थाने सक्षम करायचा आहे . ङ्गया कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्वांनीच संस्थेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले . निलेश सांबरे यांच्या




याच कार्यक्रमात जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने येथील विद्यार्थांना मोफत वह्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे तसेच मंत्री दीपक केसरकर , आमदार नितेश राणे यांसह मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते मुलांना वह्या वाटप करण्यात आले .ङ्गयावेळी मंत्री केसरकर यांनी जिजाऊ संस्थेच्या कार्याबाबत माहिती घेत संस्थेच्या कामाचे आणि कोणाकडून कसलीही देणगी न घेता निस्वार्थपणे त्यांची समाजसेवा चालू आहे. '' अश्या उद्गार यावेळी जिजाऊ संस्थेबद्दल बोलताना राणे यांनी काढले . तर लोकसभेत निलेश सांबरे यांना अपक्ष असूनही जे लोकांचे लक्षवेधी मतदान झाले त्याविषयी बोलताना राणे म्हणाले की , अपक्ष उमेदवाराला एवढ्या मोठ्या संख्यने अडीच लाख मते मिळणे ही काही सोपी गोष्ट नाही . जनतेने आपले प्रेम निलेश सांबरे युतीची गरज असेल तिथे आम्ही जिजाऊ सोबत युती तयार करायला सदैव तयार असू असे देखील राणे म्हणाले .ङ्गयावेळी उपस्थितांशी संवाद साधताना निलेश सांबरे म्हणाले की जगाच्या पाठीवर सर्व आघाडीच्या क्षेत्रात आपला कोकणी माणूस दिसला पाहिजे हे माझे स्वप्न आहे . आपण गरीब आहोत ही खंत मनात ठेवू नका तुमच्या प्रगतीसाठी जिजाऊ एका कुटुंबाप्रमाणे सोबत असेल.आपल्या रत्नागिरी दौऱ्यातील जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था ही गेली १५ वर्ष कोकणातील पालघर , ठाणे , रायगड , रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात आरोग्य , शिक्षण , रोजगार , शेती आणि महिला सक्षमीकरण या मुद्यांवर काम करत आहे . संस्थेमार्फत चालू असलेल्या विविध मोफत उपक्रमांचा लाभ यापुढे रत्नागिरी , सिंधुदुर्ग या भागांतही होणार असल्याने लोकांतून समाधान व्यक्त करण्यत आले.

# बापवन येथील जल जीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या विहिरीचे काम निकृष्ट दर्जाचे, ग्रामस्थांची चौकशीची मागणी

हरिहरेश्वर, दि.१२ ऑगष्ट (वार्ताहर) श्रीवर्धन तालुक्यातील बापवन येथील जल जीवन मिशन योजनेतर्गत झालेल्या विहीरीचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला असुन सदर कामाची चौकशी करुन ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.ङ्गङ्गकेंद्रशासन व राज्यशासनाच्या संयुक्त विदयमाने जल जीवन मिशन कार्यक्रम राबविण्यात येत असुन त्या अनुषंगाने श्रीवर्धन तालुक्यातील बापवन कांडणे येथे ५८,०००००/- (अठावन्न लाख) इतक्या रक्कमेची नळपाणी पुरवठा योजना मंजुर करण्यात आली आहे. विहीरीचे काम करताना ठेकेदाराने अंदाज पत्रकानुसार काम करणे अपेक्षित असताना ग्रामस्थांना आणि ग्रामपंचायतीला विश्वासात न घेता मर्जी प्रमाणे काम केले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विहीरीची खोदाई करताना दोन वेळा सुरुंग स्फोट केल्यामुळे गावातील घरांना तडे जाऊन घरांची पडझड झालेली आहे. स्फोटामुळे अनेक दगड गावात उडून आले तसेच शाळेतील लहान मुले या आवाजाने घाबरल्याने शाळेबाहेर पळून आली मात्र सुदैवाने त्यावेळी कोणतीही अनुचित घटना घडली नाही. अरुण शिगवण यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, सदर विहीरीच्या कामासाठी स्फोट घडवुन आणताना ग्रामस्थांना आणि ग्रामपंचायतीला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. बांधण्यात आलेली विहीर ही शासनाच्या अंदाजपत्रकानुसार झालेली नसुन शासनाच्या पैसाचा गैरवापर होऊन मोठा भ्रष्टाचार झाला असल्याने याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.ङ्गङ्गजमीनीपासुन विहीरीची खोली १० मीटर लांब आणि रुंदी ६ मीटर रुंद इतकी असताना त्यानुसार काम करण्यात आलेले नाही तसेच विहिरीच्या तळापासुन १५ फुटापर्यंत बांधकाम न करता केवळ कातळ भागापासुन वरपर्यंत बांधकाम करण्यात आले आहे. विहीरीचे काम हे निकृष्ठ दर्जाचे झाले असल्यामुळे ही विहीर केव्हाही ढासळून बुजण्याची शक्यता आहे. पाण्याच्या टाकीकरीता टाकण्यात आलेल्या कॉलमलाही तडे पडले आहेत. त्यामुळे पर्यायाने शासनाचे लाखो रुपये वाया जाऊन ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यापासुन वंचित रहावे लागणार आहे. उपअभियंता, पाणी पुरवठा उपविभाग म्हसळा यांना तक्रारी अर्ज देण्यात आला असुन त्याच्या प्रती संबधित विभागांना दिलेल्या आहेत.श्री. संदिप जाधव, हरिहरेश्वर वार्ताहर,मो.क्र.७५१७४६३१०७/ ९४०५८२८९७७

# पिंपळोली नागाव पुल मोजतोय अखेरची घटका सैनिकांच्या गावाला न्याय कधी मिळणार ?

सैनिकांचं गावच असुरक्षित

पुलाचे मुख्य संरक्षक कठडे नदीत पडलेत तुटून, तर सळ्या निघाल्या बाहेर

अपघाताची दाट भीती

सरकारने नवीन पुल बांधून देण्याची गावकऱ्यांची जोरदार मागणी

पाली/बेणसे दि.(धम्मशील सावंत) – रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील पिंपळोली नागाव हे गाव प्रामुख्याने सैनिकांचं गाव म्हणून ओळखले जाते. मात्र देशवासीयांची सेवा करणाऱ्या हेच सैनिकांचं गाव आता असुरक्षित झाल्याचे चित्रं समोरं आले आहे. याचे कारण येथील गावांना विद्यार्थी करतात. महापुरात हा पुल पाण्याखाली गेल्यावर विद्यार्थ्यांचे वारंवार शैक्षणिक नुकसान होते. कामगार वर्गासाठी देखील पर्यायी वाहतूकीसाठी दुसरा मार्ग नसल्याने वाहतूक ठप्प पडते आणि मोठी रोजगाराची समस्या निर्माण होते. शिवाय रास्त भाव धान्याचे दुकान याच गावात असल्यानं सभोवतालच्या गावातील हजारों कुटुंबांना याचा मोठा फटका बसतो. आणि वेळेत धान्य न मिळाल्याने उपासमारीसारख्या समस्येला या गावकऱ्यांना सामोरे जावे लागते.या गावाचा संपूर्ण कारभार सुधागड पाली या तालुक्याच्या ठिकाणी अवलंबून



जोडणारा आणि वाहतूक आणि रहदारीच्या दृष्टीने महत्वाचा असणारा नदी पूल अतीशय जीर्ण आणि धोकादायक स्थितित आला आहे. अखेरची घटका मोजणारा हा पुल कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती येथील गांवकरी व्यक्त करतायेतं, पुलाचे मुख्य संरक्षक कठडे नदीत तुटून पडल्याने प्रवासादरम्यान एखादें वाहन या पुलावरुन घसरून नदीत कोसळण्याची भिती गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.ऐन पावसाळयात या पुलाला दहा फुटहून अधिक उंचीच्या पाण्याचा वेढा असतो.आणि त्यामुळें येथील जनजीवन विस्कळीत होऊन जवळजवळ १० गावर आणि आदिवासी वाड्यांचा संपर्क तुटतो. वारंवार लेखी पत्रव्यवहारद्वारे प्रशासनाच्या ही बाब लक्षात आणून देखील शासन प्रशासन सरकार अद्याप कोणतेही सकारात्मक पाऊल उचलत नसल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे . सुधागड तालुक्यातील पिंपलोळी नागाव गावासह येथील अनेक आदिवासी ठाकूर धनगर वाड्या यांच्यासाठी वाहतूक आणि दलवणाळणाच्या दृष्टीने हा पुल अतीशय महत्वपूर्ण मानला जातो, सभोवताली असणाऱ्या शाळा महाविद्यालयात जाण्यासाठी याच पुलाचा वापर शाळकरी असल्याने प्रशासकीय कामकाज तसेच आरोग्याच्या दृष्टीने अनेक महिलां व ग्रामस्थांना देखील याचा मोठा फटका बसत आहे. सर्व प्रशासकीय कार्यालये पाली सुधागड मध्ये असल्याने जनतेची कामे खोळंम्बतात . या विभागातील नागरिकांची संपूर्णतः मदार या पुलावर आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे पुलाच्या दोन्ही बाजूला लागवडीखालील भातशेती क्षेत्र असल्याने पुराच्या वेळी शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसलेला आहे .गावावर उभे राहिलेले हे संकट आता कधी टळणार अशी अवस्था येथे या गावकऱ्यांची निर्माण झाली आहे. सरकारने लवकरात लवकर या पुलाला भरीव निधी देऊन या गावाला वर्षानुवर्षे भेडसावणारी पुलाची समस्या मार्गी लावावी अशी मागणी जोर धरत आहे.ङ्गङ्ग यावेळी ग्रामस्थ मंगेश पालांडे, यशवंत पालांडे, दिनेश बुरुमकर, सुबोध पालांडे, निलेश पालांडे, कल्पेश सावंत, प्रकाश पालांडे, किशोर बुरुमकर, देविदास पालांडे, उमेश म्हामुणकर, अनिकेत पालांडे, नंदू पालांडे, जनार्दन खोपकर,सुरेश पालांडे,सुधीर सावंत, संजय सावंत, आदिसह महिला, पुरुष, ग्रामस्थ युवक युवती विद्यार्थी मोठ्या संख्येने होते.

# रेल्वेवर जास्त भार

गेल्याच आठवड्यात मुंबईतील सायन रेल्वे स्थानकावरील पूल बंद झाला आणि मुंबईकरांनी पुन्हा एकदा अभूतपूर्व वाहन कोंडी अनुभवली. हा त्रास आता तब्बल अडीच वर्षे मुंबईकरांना सहन करावा लागणार आहे, ही आणखी एक भयंकर गोष्ट आहे. मुंबई ही तिच्या समृद्ध वारशासाठी ओळखली जाते; आता ती सध्या बारमाही वाहतूक कोंडीने त्रस्त अशीही ओळखली जाऊ लागली आहे. मुंबई हे जगातील सर्वात वाईट रस्त्यांवरील रहदारीचे शहर आहे, ते पाचव्या क्रमांकाचे सर्वाधिक गर्दीचे शहर आहे. मुंबईतील वाहतुकीची स्थिती सातत्याने बिघडत चालली आहे. शहराचा गर्दीचा दर, प्रवासात घालवलेला सरासरी वेळ, बेसलाइन नॉन-कंजेस्टेड पातळीपेक्षा ५३ टक्के जास्त होता म्हणजे अर्ध्या मिनिटाच्या प्रवासाला गर्दीच्या वेळी २० मिनिटांपर्यंत जास्त वेळ लागतो. या वाहतूक कोंडीचे नागरिकांच्या वैयक्तिक आरोग्य आणि शहराच्या एकूण अर्थव्यवस्थेवर अनेक दीर्घकालीन प्रभाव पडत आहेत. वाहतूक कोंडीमुळे दिवसेंदिवस मुंबईचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे, हे यात सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

त्यात गेल्या सहा महिन्यांत वाहतूक कोंडीत १८ हजार वाहनांची भर पडली आहे. हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यांत शहरात गेल्या वर्षीच्या तुलनेत १८ हजार नव्या वाहनांची भर पडल्याने, मुंबईतील वाहतूक कोंडी आणखी वाढली आहे. मुंबईत सध्या ४८ लाख वाहने धावत आहेत. शहरात २ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत, त्यात २५% रस्त्यांची विविध कामे सुरू आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची आणखी भर पडली आहे. रिकव्हरमध्ये तर अक्षरशः तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. प्रवासासाठी लागणारा वेळ, इंधनावर होणारा खर्च त्यामुळे मनुष्याच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होत आहे.

मुंबईच्या वाहतुकीची समस्या निर्माण करणाऱ्या असंख्य घटकांपैकी एक म्हणजे शहराचा भूगोल हे आहे. नवी दिल्ली आणि इतर शहरांमध्ये त्रिज्यात्मक भूगोल आहे, त्यामुळे ते बाहेरून वाढतात आणि एका स्थानाला दुसऱ्या स्थानाला अनेक मार्गांनी जोडतात. दुसरीकडे मुंबई तिन्ही बाजूने अरबी समुद्राने वेढलेली आहे, ज्यामुळे तिची वाढ मर्यादित आहे. उत्तर आणि दक्षिणेला जोडणारे पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग या दोनच प्रमुख महामार्गांमुळे गर्दीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. आता त्यात भर पूर्व मुक्त मार्गाची व सागरीकिनारा मार्गाची म्हणजेच कोस्टल रोडची झालेली आहे. पूर्व मुक्त मार्गावर आता सकाळ व संध्याकाळी भयंकर वाहतूक कोंडी अनुभवास मिळते. तसेच कोस्टल रोड अजून अपूर्ण अवस्थेत असल्याने, सध्या पूर्ण असलेल्या रस्त्यांच्या सुरुवातीस व संपण्याचा ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. अशा प्रकारे सर्वच ठिकाणांवरून मुंबईची कोंडी होत आहे. याशिवाय मुंबईत ४.१ दशलक्ष वाहने रस्त्यावर आहेत, त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. मुंबईतील कारची घनता प्रतिकिलोमीटर ६०० कारपर्यंत वाढली आहे, जी भारतात सर्वाधिक आहे. मुंबईच्या उपनगरात तर फूटपाथवरील अतिक्रमण, त्यात अरुंद रस्ते त्यामुळे गर्दीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडी होते आणि शहर कोंडल्यासारखे होते. त्यात वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणत आहेत.

सार्वजनिक वाहतुकीच्या पर्यायांबद्दल शहराच्या उपनगरीय रेल्वेवर जास्त भार आहे. दररोज ७५ लाख लोक रेल्वेने प्रवास करतात. त्यानंतर सर्वाधिक प्रवासी म्हणजे ३५ ते ३६ लाख प्रवासी बेस्ट बसचा वापर करतात. बेस्ट ही आधीच तोट्यात असल्याने, सध्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी संघर्ष करत आहे, त्यात कमी होत जाणारा बसताफा. बसताफा वाढवण्यात येणाऱ्या अडचणी पाहता, असलेल्या बस गाड्या वाहतूक कोंडीत अडकल्या कारणाने वेळेवर येत नसल्याने व येणाऱ्या बस या गर्दीने तुडुंब भरल्या असल्याने लोकांना हा पर्यायदेखील गैरसोयीचा वाटतो, त्यामुळे साहजिकच लोकांचा कल हा खासगी वाहनांकडे आढळून येतो, त्यामुळे स्वतःचे वाहन घेणे याकडे लोकांचा ओढा जास्त आहे, त्यातच कोरोना नंतर स्वतःच्या वाहनाची गरज हा पर्याय लोकांना जास्त आवडू लागला आहे. तिसरा पर्याय शहरातील मेट्रोसेवा.

सुस्थापित मेट्रो नेटवर्कचा अभाव हे शहरातील वाहतूक कोंडीचे प्रमुख कारण आहे. सध्या मुंबई शहरात तीन मेट्रो सेवा सुरू आहेत व चौथी मेट्रो सेवा लवकरच सुरू होणार आहे. मेट्रोच्या सुरू असलेल्या बांधकामासाठी घेतलेल्या जागेमुळे शहरातील काही भागांमध्ये रस्त्यावरील मार्गांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीवर मर्यादा आल्या आहेत. मुंबईत आणखी नवीन पाच मेट्रो मार्ग सुरू होणार आहेत. मात्र ते सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल,

अशी आशा बाळगणे मूर्खपणाचे ठरेल, कारण सध्याच्या मार्गांवर मेट्रो सेवा सुरू आहे. तेथील वाहतुकीवर कोणताही फरक पडलेला नाही, उलट दिवसेंदिवस वाहतूक कोंडीही वाढत आहे. मुंबईत देशातील एकमेव मोनो मार्ग सुरू आहे; मात्र म्हणून तेथील मार्गाचा विचार करता व त्यावरील प्रवाशांची संख्या पाहता वाहतूक कोंडी कमी होईल, अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे ठरेल .

नवनवीन येणाऱ्या गाड्यांचे प्रकार, लोकांकडे खुळखुळणारा पैसा त्यामुळे कोणताही सारासार विचार न करता व अनेक गाड्या रोज रस्त्यावर येत आहे व गर्दीच्या वेळेस सर्वच रस्त्यांवर अभूतपूर्वक कोंडी पाहावयास मिळत आहे. या वाढत जाणाऱ्या वाहनांसाठी कोणतीही पार्किंगची सोय उपलब्ध नसल्याने, सर्रासपणे रस्त्यावर गाड्या उभ्या केल्या जात आहेत, त्यामुळे साहजिकच रस्त्यावरील मार्गिका या पार्किंगने अडवल्या जात आहेत

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक

# सूर्योदय

सोमवार १२ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## भगवा सप्ताह निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मंडणगडात ज्येष्ठ शिवसैनिकांचा सन्मान– ज्येष्ठ शिवसैनिकांनी दिला शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्ष जडणघडणीतील आठवणींना उजाळा

मंडणगड : प्रतिनिधी, दि. ११ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने राज्यभरात सुरु असलेल्या भगवा सप्ताहाच्या निमित्ताने मंडणगड तालुका शाखेच्या वतीने पक्षाच्या कार्यालयाच्या सभागृहात दि. ११ ऑगस्ट रोजी तालुक्यातील जेष्ठ शिवसैनिकांचा सन्मान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवर व ज्येष्ठ शिवसैनिकांनी वरिष्ठ व स्थानिक पातळीवरील पक्षाच्या स्थापनेनंतर पक्षाच्या जडणघडणीत आपला व सहकाऱ्यांचा सहभाग, प्रतिकूल परिस्थितीत पक्ष वाढीसाठी केलेले प्रयत्न याचबरोबर जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिकांचा गौरवपत्र व भेटवस्तू देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात दिवंगत शिवसैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.ङ्क कार्यक्रमास माजी खासदार अनंत गीते, माजी आमदार संजय कदम, तालुका प्रमुख संतोष गोवळे, संपर्क प्रमुख




महेश गणवे,सुभाष बेलोसे, राजकुमार निगुडकर, संतोष घोसाळकर,दीपक घोसाळकर, वैशाली चोरगे, मोहन दळवी, अँड धनंजय करमरकर आदी मान्यवर, पदाधिकारी व मोठ्या संख्येने ज्येष्ठ शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी माजी खासदार अनंत गीते शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना म्हणाले कि, पक्षफुटीनंतर पक्षाच्या अडचणीच्या काळातनंतर पक्षाने पुन्हा नव्याने घेतलेल्या उभारणीमध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ शिवसैनिकांचा सिंहाचा वाटा आहे. पक्षफुटीनंतर शिवसेना वाचवण्याकरिता सर्वात आधी जेष्ठ शिवसैनिक रस्त्यावर उतरले, पक्षाच्या जडणघडणीत व आता पुन्हा पक्षाच्या उभारणीत ज्येष्ठ शिवसैनिकांचे महत्वपूर्ण कार्य असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

माजी आमदार संजय कदम यांनी यावेळी सन १९८७ सालानंतर आज ३७ वर्षांनी पक्षाच्या वतीने भगवा सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात मंडणगड तालुक्याने आयोजित केलेल्या ज्येष्ठ शिवसैनिकांचा सन्मान हा कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे म्हटले. ज्येष्ठ शिवसैनिकांचा सन्मान म्हणजे पक्षातील सर्वांचा सन्मान असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी संजय कदम यांनी आपल्या भाषणात विरोधकांचा खरपूस समाचार ही घेतला.ङ्ककार्यक्रमात तालुका प्रमुख संतोष गोवळे, राजकुमार निगुडकर, संतोष घोसाळकर, सुभाष बेलोसे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.ङ्कफोटो भगवा साप्ताह औचीत्याने आयोजित ज्येष्ठ शिवसैनिकांचा सन्मान कार्यक्रमात शिवसैनिकांचा सत्कार करताना माजी खासदार अनंत गीते, माजी आमदार संजय कदम, संतोष गोवळे व अन्य.

## तिडे प्राथमिक शाळेमध्ये जॉय ऑफ गिव्हिंग कार्यक्रम संपन्न

मंडणगड : प्रतिनिधी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तिडे आदिवासी वाडी या शाळेमध्ये डिव्हग्लोबल एज्युकेअर फौउंडेशन यांच्यावतीने शाळेसाठी वॉटर फिल्टर देण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही आज अशी काही गावे आपल्याला पाहायला मिळतात, की जिथे अजून जगण्यासाठी प्राथमिक सुविधा सुद्धा पोचलेल्या नाहीत. जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो आहे. ज्या गावात जायला अजून नीट रस्ता सुद्धा नाही किंवा आधुनिक सेवा सुविधेनुसार या गावचे लोकेशन गुगल वर सुद्धा मिळत नाही ,अशा ह्या आदिवासी गावात एक अख्खी वस्ती आहे आणि त्यांच्या मुलांसाठी एक छोटीशी शाळा सुद्धा आहे. ही एक आशादायी बाब म्हणता येईल. निसर्गाच्या सानिध्यात राहणारे आणि नैसर्गिकरित्या जगणारी ही साधी माणसं. अगदी नदीकिनारी राहणारी. बाजूला वाहणारी भारजा नदी. २४ तास पाणी घेऊन वाहणारी नदी असली तरी आदिवासी वाडीत पिण्याच्या




पाण्याची व्यवस्था नाही. आजही त्यांना नदीच्या बाजूला खड्डाखोदून त्यातून पाणी भरावे लागते. ही बाब लक्षात घेऊन डिव्हग्लोबल एज्युकेशन फौउंडेशनच्या संचालक मंडळाने पुढे सरसावत ,या विद्यार्थ्यांना स्वच्छ ,निरामय व निर्धोक पाणी मिळावे. यासाठी शाळेला वॉटर फिल्टर भेट म्हणून दिले आहे. आपल्यालाही आता वॉटर फिल्टर मधून पाणी पिता येणार , हा मुलांच्या डोळ्यांतून ओसंडणारा आनंद पाहून, कार्यकर्त्यांचे मन हेलावून गेल. त्यावेळच्या मुलांच्या डोळ्यातील उत्सुकता , उत्कट भाव हा केवळ शब्दातीत होता. या कार्यक्रमाला कै.सौ. सावित्रीबाई भागोजी निमदे कुणबी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित मंडणगडचे चेअरमन श्री. दिनेश सापटे उपस्थित होते. त्याचबरोबर लालबहादूर शास्त्री हायस्कूल दहागाव चे माजी मुख्याध्यापक श्री. भरत पाटील ,उद्योजक पांडुरंग बांद्रे ,सौ अक्षता बैकर तसेच तिडे शाळेचे मुख्याध्यापक श्री. निलेश लोखंडे, शिक्षिका सौ.वर्षा जाधव तसेच डिव्हग्लोबल एज्युकेअर फौउंडेशनचे सभासद मॅलिसा बांद्रे,सिध्देश जगदाळे आणि विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. ङ्कसर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप संस्थेमार्फत करण्यात आले. भारत मातेची मूर्ती ही देण्यात आली. ङ्क देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे. हा गुण समाजाला घेण्यासारखा आहे.याप्रसंगी डिव्हग्लोबल एज्युकेअर फौउंडेशनच्या संस्थापिका कुमारी सानिका बांद्रे यांनी फाउंडेशनचे ध्येय आपल्या प्रस्तावनेतून स्पष्ट केले. तसेच डिव्हग्लोबल एज्युकेअर फौउंडेशनचे संस्थापक कुमार शुभम बैकर यांनी भारत मातेच्या मूर्ती विषयी आपली संकल्पना व संस्कृतीचे दर्शन घडवले. श्री .भारत पाटील सरांनी फौंडेशन चे कार्य समजून घेऊन यापुढे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. पतसंस्थेचे चेअरमन श्री.दिनेश सापटे यांनी व्यवसाय व त्यासाठी लागणारे कर्ज विषयक पालकांना मार्गदर्शन केले. ङ्क शेवटी आभार प्रदर्शनाने या उत्कृष्ट अशा कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शिवसेना भगवा सप्ताह निमीत्त सदस्य नोंदणीच्या फॉर्मचे वाटप

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:

अलिबाग : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने संपूर्ण महाराष्ट्रात भगवा सप्ताह साजरा करण्यात आला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या आदेशानुसार, संपूर्ण महाराष्ट्रात ४ ते ११ ऑगस्ट २०२४ या दरम्यान हा सप्ताह साजरा करण्यात आला.ङ्क भगव्या सप्ताहच्या निमीत्ताने दि.११ ऑगस्ट रोजी चौल नाका येथे शिवसेना सदस्य नोंदणी राबविणे, बुथ प्रमुख, गट प्रमुख व बी.एल.ए. यांच्या नेमणुका करणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे अश्या कामांसाठी चौल नाका येथे नोंदणी शिबिराचे




आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, विभाग प्रमुख मारुती भगत, माजी ग्रामपंचायत सरपंच सौ.रुपाली म्हात्रे, उपसरपंच अजित गुरव, उपविभाग प्रमुख शैलेश घरत, शहर प्रमुख रोहित पाटील, शाखा प्रमुख राजेंद्र गुरव, अजित मिसाळ, महिला उपतालुका संघटिका सौ.लीना घरत व शिवसैनीक उपस्थित होते.

## सर्व्हायकल कर्करोग प्रतिबंधात्मक शिबिरास उत्फुतपणे उस्फुर्तपणे प्रतिसाद... सदर शिबिरात १२० मुलींनी मोफत लसीचा लाभ घेतला..

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे

खारघर : पनवेल विधानसभेचे कार्य सम्राट आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघर शहरातील केशरी व पिवळ्या रेशनकार्ड धारक असलेल्या ९ वर्षावरील ते १८ वर्षाखालील मुलींसाठी गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग ( ) मोफत प्रतिबंधक लस (एचपीव्ही व्हक्सिनेशन) कॅम्प चे आयोजन दि.५ ऑगष्ट २०२४ रोजी फ्युचर जनरेशन ग्रुप ऑफ स्कुल, सुप्रीम टॉवर, सेक्टर १८ खारघर,नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आले.ङ्क लसीकरण अभियानासाठी कॅन्सर पेशेंट एड असोसिएशन च्या वतीने डायरेक्टर कैन्सर रिसर्च प्रिवेंशन यूनिट च्या डॉ. नूपुर खरे,ङ्कअसिस्टंट कॅन्सर रिसर्च प्रिवेन्शन यूनिट च्या प्रिया प्रसाद, लैब ऑफिसर कॅन्सर रिसर्च यूनिट च्या नाजिया ख़ान होत्याङ्कखारघर डॉक्टर असोसिएशन चे अध्यक्ष डॉ निखिल भारंबे, भाजप खारघर मंडल वैद्यकीय सेल च्या अध्यक्षा डॉ ज्योती जाधव,डॉ रुद्रा बिरारी, अधिपरिचारिका शीतल कदम, हर्षा पाटील, अंकीता घाडी, स्नेहा गोलांबडे यांचे सहकार्य लाभले.ङ्क या कार्यक्रमाचे आयोजक श्री रामशेठ ठाकुर सामाजिक विकास मंडल, सखी वुमन्स वेलफेअर, भाजपा उत्तर भारतीय मोर्चा (उत्तर रायगड जिल्हा),नमो नमो मोर्चा भारत, पंडित पारसनाथ शर्मा चेरीटेबल ट्रस्ट, भाजपा खारघर शहर भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या शिबिरात १२० मुलींनी मोफत लसीचा लाभ घेतला.ङ्ककार्यक्रमाला लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत दादा ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश दादा कोळी, मा. सभागृह नेते परेश दादा ठाकूर, बाळासाहेब पाटील,नमो नमो मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष सत्यप्रकाश सिंग यांनी भेट दिली.ङ्क सदर कार्यक्रम यशस्वी करणेसाठी सौ.डॉ. निलम विसपुते(सखी वुमन्स् वेलफेअर) तसेचङ्कखारघर चिटणीस , नमों नमों भारत महिला अध्यक्षा , संतोष शर्मा ( उत्तर रायगड) उत्तर भारतीय मोर्चा जिल्हा अध्यक्ष , स्नेहल बोढई सह - संयोजिका ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा , मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, सोशल मीडिया अध्यक्ष अजय माळी, एनजीओ अध्यक्ष राजेंद्र मांजरेकर , सेक्टर १८ अध्यक्ष अमित बोढई , सखी वूमन्स वेलफेअर उपाध्यक्ष, प्रीती शर्मा यांनी विशेष मेहनत घेतली.



## साद सह्याद्री प्रतिष्ठान व सहयोगी संस्था यांचे वतीने ७८व्या स्वातंत्र्यदिनी , ७८ ठिकाणी एकाच वेळी वृक्षारोपणाचा उत्सव!

तळा कृष्णा भोसले.

वाढते तापमान आणि ग्लोबल वॉर्मिंग या गंभीर समस्यांना तोंड देण्यासाठी साद सह्याद्री प्रतिष्ठान एक मोठे पाऊल उचलत आहे. देशाच्या ७८व्या स्वातंत्र्यदिनी, प्रतिष्ठान ७८ ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करणार आहे. हा कार्यक्रम पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छ हवा या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असणार आहे.ङ्कङ्कया वृक्षारोपण मोहिमेतून अनेक वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या वृक्षांमुळे हवामान बदलाच्या प्रभावांना तोंड देण्यास मदत होईल, पर्यावरण संतुलन राहील आणि भविष्यातील पिढ्यांसाठी एक हिरवागार भारत निर्माण होईल.ङ्कङ्क ‘‘स्वातंत्र्यदिनी वृक्षारोपण करून आपण आपल्या देशाची सेवा करू शकतो. वृक्ष हे आपल्या पर्यावरणाचे रक्षक आहेत. त्यामुळे या मोहिमेत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.’’ङ्कङ्कया वृक्षारोपण कार्यक्रमाच्या ठिकाणांची माहिती लवकरच जाहीर केली जाणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन साद सह्याद्री प्रतिष्ठानने केले आहे.ङ्कङ्कया वृक्षारोपण मोहिमेबद्दल अधिक माहितीसाठी आपण साद सह्याद्री प्रतिष्ठानला संपर्क करू शकता.ङ्कङ्क(तुमची संस्था/तुम्ही) या वृक्षारोपण मोहिमेला योगदान देत असाल, पर्यावरण संरक्षणाच्या या पुढाकाराला यशस्वी करण्यासाठी आपले सहकार्य देण्याचे आवाहन करतो.ङ्कङ्कशेवटी, वृक्षारोपण हा केवळ एक कार्यक्रम नसून, आपल्या भविष्यासाठी एक गुंतवणूक आहे. या वृक्षांमुळे आपल्या भावी पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण मिळेल.ङ्कङ्कआपल्याला सर्वांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई – ४०००८१– अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )